स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

Making cities work for everyone

MAHA URBAN WASH-ES COALITION

ALL INDIA INSTITUTE OF LOCAL SELF - GOVERNMENT

RCUES Mumbai

unicef for every child

# स्वच्छता कामगारांसाठी हस्तपुस्तिका



(स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा, सुरक्षितता व जबाबदाऱ्या)



शहरी व्यवस्थापन केंद्राने प्रावधीत केलेले सर्व तपशील हे पक्षकाराने करारात व विचारार्थ विषयपत्रिके नुसार नमूद केल्यानुसार आहेत. संस्थेला उचित अभिस्वीकृतीसह सदर दस्तऐवजातील माहिती इतरत्र वापरता व उधृत करता येईल. अन्यथा नमूद असल्याशिवाय, शहरी व्यवस्थापन केंद्रानेच सदर प्रतिमा व्युत्पन्न केल्या आहेत.

**फेब्रुवारी २०२३**

**सादरकर्ते : संयुक्त राष्ट्र बालक निधी**

शहरी व्यवस्थापन केंद्र ही महिलांनी नेतृत्व केलेली ना नफा तत्वावर चालणारी व सर्वसमावेशक व समन्यायी विकासासाठी लवचिक प्रणालीसाठी कटिबद्ध असलेली संस्था आहे. स्थानिक प्रशासनाला बळकट करण्यासाठी व शाश्वत संस्थात्मक संरचनांची बांधणी करण्यासाठी संस्था विविध शासनाच्या सोबत कार्यरत आहोत. तसेच भेद्य वर्गातील लोकांकडे आवश्यक असेलेले पाठबळ आणि साधने असल्याची खातरजमा करण्यासाठी त्यांच्यासोबत संस्था कार्यरत आहे मागील २५ वर्षात संस्थेने कामगिरीचे मूल्यमापन, क्षमता बांधणी व विकेंद्रित संस्थात्मक बळकटीकरणातील शहरी व ग्रामीण आव्हानांना भिडण्यासाठी संस्थेने मुलभूत व नाविन्यपूर्ण उपाययोजनांवर काम केले आहे. अधिक माहितीसाठी आमच्या

www.umcasia.org या संकेतस्थळाला भेट द्या

स्वच्छता क्षेत्रामध्ये व्यावसायिकता येण्यासाठी व उच्च गुणवत्तेच्या सेवा उपलब्ध होण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या बालक निधीने नागरी व्यवस्थापन केंद्राशी भागीदारी केली आहे. स्वच्छता कामगारांच्या प्रशिक्षण व क्षमता बांधणीसाठी व कामगारांच्या अधिक तगड्या सेवानिश्चीतीला चालना देण्यासाठी व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या भूमिका व जबाबदाऱ्यांच्या बाबत जागरूकता वाढण्यासाठी संयुक्त राष्ट्र बालक निधी व नागरी व्यवस्थापन केंद्र एकमेकांच्या सोबत कार्यरत आहेत. कामगारांची सुरक्षितता व प्रतिष्ठा कायम राहील अशा पद्धतीने स्वच्छता सेवा प्रापित करण्यासाठी ग्राम पंचायतींनी अनुसरण्याच्या मार्गदर्शक सूचना विकसित करणे सदर कार्यक्रमात परिकल्पित आहे. उत्तम कामगिरीसाठी प्रोत्साहन व प्रतिष्ठा मिळविण्याच्या दृष्टीकोनातून स्वच्छता कामगारांसाठी संप्रेषण साहित्य, व मत्ता विकसित करण्याचे देखील सदर कार्यक्रमात अनुस्यूत आहे.

महाराष्ट्र नागरी पाणी- स्वच्छता- आरोग्य आणि पर्यावरणीय स्वच्छता सहयोग हा विभागीय नागरी आणि पर्यावरण अभ्यास केंद्र (RCUES), अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG), मुंबई आणि युनिसेफ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेला उपक्रम आहे. या उपक्रमाचा उद्देश आहे की, स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य स्तरीय शासकीय यंत्रणा, शैक्षणिक संस्था आणि क्षेत्रिय तज्ञ यांना एकत्रित आणून नगरपालिकांची क्षमता वाढविणे तसेच महाराष्ट्रातील नागरी भागात पाणी, स्वच्छता आणि आरोग्य विषयक सेवांची उपलब्द्धता वाढविण्यासाठी सहयोगी कृतीला प्रोत्साहन देणे. स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत विभागीय नागरी आणि पर्यावरण अभ्यास केंद्र (RCUES), अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG), मुंबई ही 'स्वच्छता ज्ञान सहयोगी' (Swachhata Knowledge Partner) आहे तसेच स्वच्छ महाराष्ट्र मिशन (नागरी) संचालनालय, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे समवेत सामंजस्य करार झाला आहे. या करारानुसार क्षमता बांधणी करणे, सहयोगांसाठी समन्वय करणे आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांना सहाय्य करणे हे उद्दिष्ट आहे. त्यास अनुसरून विभागीय नागरी आणि पर्यावरण अभ्यास केंद्र (RCUES), अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG), मुंबई यांनी युनिसेफ महाराष्ट्र यांच्या सहाय्याने आणि महाराष्ट्र अर्बन वॉश आणि एनवारमेंटल सॅनिटेशन कोएलिशन यांच्या मार्फत "स्वच्छता कर्मचाऱ्यांची व्यावसायिक सुरक्षितता आणि प्रतिष्ठा या विषयाशी संबंधित राज्यव्यापी सखोल प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला आहे. हा प्रशिक्षण कार्यक्रम स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०/ अमृत २.० / राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (NULM) / शासनाच्या योजना जसे की 'नमस्ते', 'सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज', 'कचरामुक्त शहरे प्रमाणीकरण', 'उघड्यावरील शौचास जाण्यापासून मुक्त (ODF / ODF+ / ODF++/ Water+)', 'स्वच्छ सर्वेक्षण २.०' यांना अनुरूप असून महाराष्ट्रामधील शहरातील स्वच्छता कर्मचाऱ्यांना प्रतिष्ठा प्रदान करण्यासाठी आणि स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत उद्दिष्टपूर्तीसाठी उपयुक्त ठरेल.

**अस्वीकार:**
नागरी व्यवस्थापन केंद्र अहमदाबाद व संयुक्त राष्ट्र बालक निधी , नवी दिल्ली संयुक्त राष्ट्र बालक निधीने नागरी व्यवस्थापन केंद्राच्या तांत्रिक पाठबळाने सदर दस्तऐवज तयार केला आहे. सदर दस्तैवजाचा उपयोग केल्यामुळे त्याच्या झालेल्या कोणत्याही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अथवा अनुषंगिक तोटा किंवा नुकसानीस सदर दस्तैवजातील कोणत्याही मजकुरास कोणत्याही परिस्थितीत जबाबदार धरता येणार नाही. तसेच सदर दस्तऐवज त्रयस्थ पक्षकारांना उपलब्ध करून दिल्या सदर अस्वीकार संबंधित पक्षकारांना जारी करणे बंधनकारक आहे.

# स्वच्छता कामगारांसाठी

# हस्तपुस्तिका

(स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा, सुरक्षितता व जबाबदाऱ्या)



स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

Making cities work for everyone

MAHA URBAN WASH-ES COALITION

RCUES Mumbai

unicef for every child

# स्वच्छता कर्मचाऱ्यांची व्यावसायिक सुरक्षितता आणि प्रतिष्ठा यासंदर्भात राज्यव्यापी प्रशिक्षण कार्यक्रम - महाराष्ट्र

### आणि हस्तपुस्तिकेची मराठी आवृत्ती विकसिकरण

द्वारे

## महाराष्ट्र नागरी पाणी- स्वच्छता- आरोग्य आणि पर्यावरणीय स्वच्छता सहयोग

**विभागीय नागरी आणि पर्यावरण अभ्यास केंद्र (RCUES),**
**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई (AIILSG)**
**आणि यूनिसेफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने**



## वैयक्तिक माहिती

**नावः**

-----------------------------------------------------------------

**गावाचे नावः**

-----------------------------------------------------------------

**भ्रमणध्वनीः**

-----------------------------------------------------------------

**रक्तगटः**

-----------------------------------------------------------------

## आपत्कालीन संपर्क तपशीलः

**नावः**

-----------------------------------------------------------------

**भ्रमणध्वनीः**

-----------------------------------------------------------------

# या हस्तपुस्तिकेविषयी

सदर हस्तपुस्तिका ही स्वच्छता कामगारांनी वापरणे अपेक्षित आहे. सद्य कार्यरत स्वच्छता कामगारांना माहिती देण्याचे सदर हस्तपुस्तिकेचे उद्दिष्ट आहे.  स्वच्छता कामगार मुख्यत: शौचालये सफाई,  मलकुंड रिक्त करणे, घन कचरा संकलन व वाहतूक, रस्ते झाडणे, भूमिगत मलवाहिन्या व देखभाल छिद्रांची साफसफाई अशी कामे करीत असतात. सर्व समुदायांचे आरोग्य अबाधित राहण्यामध्ये स्वच्छता कामगारांची महत्वाची भूमिका आहे. मात्र सदर काम करताना स्वच्छता कामगारांना सुरक्षात्मक यंत्रावली, व उपकरणे मिळत नाहीत. त्यामुळे स्वच्छता कामगारांना त्यांच्या सेवेची पद्धत व सेवाशर्ती, त्यांची  भूमिका व जबाबदारी, हक्क व अधिकारांची माहिती करून देणे आवश्यक आहे.



मी निर्मला, आपण मला निर्मला दीदी म्हणू शकता. मी शिक्षिका आहे. तुमच्या कामाशी संबंधित जबाबदाऱ्या, सुरक्षितता, आरोग्य, जोखिमी व अधिकारांबाबत मला तुमच्याशी बोलायला आवडेल.



स्वच्छता कामगार म्हणून तुम्ही आमच्या गावाचे स्वच्छता साथी आहात. एक स्वच्छता कामगार म्हणून तुम्ही गावात अत्यावश्यक काम करून आमचे गाव स्वच्छ व निरोगी ठेवण्यात महत्वाची भूमिका निभावता.  आपल्या सगळ्यांच्या अथक परिश्रमामुळेच:



आमच्या घरातून कचरा उचलला जाऊन रस्ते व आजूबाजूचा परिसर कचरामुक्त व स्वच्छ राहतो.



आमच्या गावातील अंगणवाडी, शाळा, आरोग्य केंद्रे, व सामुदायिक / सार्वजनिक शौचालये स्वच्छ राहतात.



आमच्या येथील मलकुंड / खड्डे हे गरजेचे असेल तेव्हा स्वच्छ होतात.



आमची तुंबलेली गटारे स्वच्छ होतात

तुमच्या प्रयत्नांमुळेच आमच्या परिसरातील सौंदर्य अबाधित राहून गाव/शहरे राहण्याच्या योग्य झाले आहे. गावातील जलधी देखील प्रदूषण मुक्त राहतात.

**"आम्ही नागरिक आपल्याला व आपल्या अमूल्य सेवेचा आदर करतो. आम्ही आपले आभारी आहोत."**

# तपशील



सदर हस्तपुस्तिका पाच विभागात विभागली.

## विभाग १

**अ** *यामध्ये भूमिका व जबाबदाऱ्या; विविध स्वच्छता कार्यांसाठी आवश्यक सुरक्षा यंत्रावली, औजार व उपकरणे विशद केली आहेत.*

## विभाग २


**ब** *यामध्ये स्वच्छता कामगारांचे नियोक्त्याशी संबंध*

**क** *हक्क व अधिकार*

**ड** *आरोग्य, स्वच्छता, पोषक आहार,*

**इ** *तसेच काय करावे व करू नये या बाबी समाविष्ट आहेत*

## विभाग — अ



### शौचालय स्वच्छता कामगार

सामुदायिक / सार्वजनिक / संस्थागत शौचालयाची सफाई करणारे कामगार म्हणून

1. शौचालयाची स्वच्छता करणारे स्वच्छता कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या
2. आपली सुरक्षा यंत्रावली
3. आपली अवजारे व स्वच्छक जाणून घ्या



### मलकुंड / खड्डा स्वच्छता कामगार

मलकुंड / खड्डा साफ करणारे म्हणून

1. मलकुंड / खड्डे स्वच्छता कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या
2. आपली सुरक्षा यंत्रावली
3. आपली अवजारे व स्वच्छक जाणून घ्या



### मलवाहिनी स्वच्छ करणारे

मलवाहिनी स्वच्छ करणारे

1. मलवाहिनी स्वच्छ करणारे म्हणून आपल्या जबाबदाऱ्या
2. आपली सुरक्षा यंत्रावली
3. आपली अवजारे व उपकरणे जाणून घ्या



## रस्ते झाडणारे / स्वच्छ ठेवणारे

### रस्ते झाडणारे / स्वच्छ ठेवणारे म्हणून

1. रस्ते झाडणारे / स्वच्छ ठेवणारे म्हणून आपल्या जबाबदाऱ्या
2. आपली सुरक्षा यंत्रावली
3. आपली उपकरणे व औजारे जाणून घ्या

---



## कुटुंब स्तरावरील कचरा संकलक

### दारोदार कचरा संकलक म्हणून

1. दारोदार कचरा संकलक म्हणून आपल्या जबाबदाऱ्या
2. आपली सुरक्षा यंत्रावली
3. आपली उपकरणे व औजारे जाणून घ्या

## विभाग

**ब** — नियोक्त्याशी संबंध

**क** — हक्क व अधिकार

**ड** — आरोग्य, स्वच्छता व आहार

**इ** — काय करावे व करू नये




## स्वच्छता कामगारांच्या भूमिका व जबाबदाऱ्या


एक स्वच्छता कामगार म्हणून आपण शौचालये, मलवाहिन्या, मलकुंडे / खड्डे, घन कचरा संकलन व वाहतूक, रस्ते झाडणे अशा विविध कामात सहभागी असता. आपण समाजाला अत्यावश्यक सेवा देत असल्यामुळे आपल्याला आपल्या जबाबदाऱ्या समजणे आवश्यक आहे. कामाचे स्वरूप, त्यातील जोखमी व तांत्रिक बाजू यानुसार जबाबदाऱ्यांमध्ये फरक पडू शकेल.

## सुरक्षा यंत्रावली (व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे):

स्वच्छता कामगार म्हणून आपल्याला कचरा हाताळताना योग्य अशा सुरक्षा उपकरणाच्या अभावामुळे व घातक वायू व द्रवांमुळे आपण जखमा व दुखापती झाल्याचे अनुभवले आहे. त्यामुळे व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे अशा संसर्ग, जखमा व आरोग्याशी संबंधित समस्यांपासून आपले संरक्षण करतात. आपल्या सुरक्षेसाठी व सुरक्षितपणे काम करण्यासाठी व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे अत्यावश्यक आहेत.




सुरक्षा चष्मे




उच्च दृश्यता परावर्तक आवरण




नायट्राईल हातमोजे



पूर्ण शरीर समावेशक पोशाख




शिरस्त्राण




शूज



नाकाच्या अडकणीसह कणीय मुखपट्टी



एप्रन




जोड्यांसह मांड्या झाकणारे पोशाख



स्टील टो शूज

# स्वच्छतेसाठी अवजारे व उपकरणे

स्वच्छता कामगार म्हणून आपण विविध प्रकारची कार्ये हाताने करत असताना यांत्रिक दृष्टीकोन समजून घेणे व स्वीकारणे आवश्यक असते. आपल्या नियोक्त्याने यथोचित अवजारे, वाहने व अन्य आवश्यक बाबी पुरविणे अत्यावश्यक आहे. त्याचा वापर करण्याचे प्रशिक्षण / मार्गदर्शन मिळाल्यावर सदर अवजारे, उपकरणे व वाहनांचा नियमित वापर करणे आवश्यक आहे.




ग्रॅबर मशीन




मिनी ट्रिपर




निर्वात वाहन



कुदळ




फावडे



झाडू



वाइपर




नरम कपडा




मग




बादली




स्पंज



ब्रश



पॅन



# आमच्या गावातील / शहरातील स्वच्छता साथी

घन व द्रव कचरा व्यवस्थापनासाठी सहा प्रकारचे स्वच्छता कामगार कार्यरत असतात. स्वच्छता विषयक पायाभूत सुविधांचे परिचालन, देखभाल व दुरुस्ती हे आवश्यक आहेत.

आता प्रत्यक्ष कार्य करताना स्वच्छता कामगारांच्या भूमिका व जबाबदाऱ्या , सुरक्षा यंत्रावल्या, अवजारे व उपकरणे अशा अनुषंगाने प्रत्येक प्रकारच्या स्वच्छता कार्याचा आढावा घेऊया.



**शौचालय स्वच्छ करणारे**



**मलकुंडे / खड्ड्यांचे निरवमलन / उपसा**



मलवाहिनी स्वच्छ करणारे



रस्ते झाडणारे



कुटुंब स्तरावरील कचरा संकलक



कचरा प्रक्रिया केंद्रात कचरा हाताळणारे कामगार

# शौचालय स्वच्छ करणारे



## सामुदायिक / सार्वजनिक / संस्थागत शौचालयांची स्वच्छता करणारे कामगार





### १. शौचालय साफ करणारे कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या:



आपल्याला वाटप झालेल्या शौचालये, / स्वच्छता संकुले स्वच्छ निर्जंतुक करा



संकुलातील कचरा संकलित करून त्याचे पडलेले डाग साफ करून तो वापरण्यासाठी स्वच्छ केला पाहिजे



द्रव निर्मलकाचा उपयोग करून शौचालय / मुत्रालये / थुंकदान व्यवस्थित स्वच्छ करा



फरशी, दरवाजे, कड्या, संवातक, धावन कुड, बादल्या, मग्गा स्वच्छ करा



उपकरणांचा वापर करून स्वच्छता मार्गदर्शक सूचनांच्या नुसार दररोज शौचालये स्वच्छ करा



फरशीतील तुंबलेल्या मलवाहिन्या, कुंड, शौचालये व मुत्रालयातील तुंबारा काढून टाका.



शौचालयाच्या आवारातील कचरा कुंड्या नियमितपणे रिकाम्या करून स्वच्छ करा.



फिनील, आम्ल, इत्यादी स्वच्छता साहित्य पर्याप्त प्रमाणात उपलब्ध असल्याची खातरजमा करा.



निर्धारित क्षेत्रात कचऱ्याची विल्हेवाट लावा किंवा कचरा संकलन करणाऱ्या कडे सुपूर्द करा.



निर्धारित केलेल्या वारंवारतेने शौचालय संकुल स्वच्छ होत असल्याची खातरजमा करा



व्यक्तीगत सुरक्षितता उपकरणे व अवजारांची नियोक्ता / ग्रामपंचायतीकडे मागणी नोंदवा



विरंजन, स्वच्छक, निर्जंतुकीकरण द्रावण वापरताना अन्नसेवन, पेयपान किंवा धुम्रपान करू नका

# २. आपल्या सुरक्षा यंत्रावली



सुरक्षा चष्मे , एन ९५ मुखपट्टी , १३ इंची नायट्राइल हातमोजे, गणवेष, परिधान करा




काम झाल्यावर आपले हातमोजे, मलवस्त्र व जोडे पाणी आणि साबणाने धुवा व वाळवा




आपली व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे फाटली किंवा खराब झालेली असल्यास किंवा किमान ६ महिन्यातून एकदा तरी बदला


# वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा आणि काढण्याचा क्रम - शौचालय सफाई कर्मचारी




वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याआधी पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे




## वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा क्रम




मास्क




एप्रन





हातमोजा





शूज


## वयक्तिक सुरक्षा साधने काढण्याचा क्रम





शूज




एप्रन




हातमोजा




मास्क

वयक्तिक सुरक्षा साधने काढल्यानंतर पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे



## ३. आपली अवजारे व स्वच्छक माहित करून घ्या

**a.आपली स्वच्छता अवजारे -**
झाडू, फरशी घासण्याचा ब्रश, मार्जनी स्पंज, फरशी पुसणी, बादली, मग्गा , सुपली व मऊ कापड .




शौचालय वापरणाऱ्याच्या हाताला लागणार नाही अशा ठिकाणी आपली स्वच्छता करण्याची अवजारे ठेवा.



वापरून झाल्यावर आपली अवजारे धुऊन सुरक्षित ठिकाणी ठेवा



वाईपार




नरम कपडा




झाडू




बादली



टाईल ब्रश



स्पंज



बाउल ब्रश



पॅन



मग

**ब.आपले स्वच्छक व उपभोग्य –**
द्रव साबण, काच व आरसा स्वच्छ करणारे द्रावण, डांबराच्या गोळ्या, विल्हेवाट योग्य कचऱ्याच्या पिशव्या, हात धुवायचा साबण / द्रावण, हात पुसायचा कापड / जंतूनाशक



कोणतीही स्वच्छक व उपभोग्य वस्तू शौचालयाच्या बाहेर नेऊ नका



स्वच्छकांचा इष्टतम प्रमाणात वापर करा व त्यांचा अपव्यय टाळा.



स्वच्छक व उपभोग्य वस्तूंचा साठा संपण्या अगोदर संबंधित पर्यवेक्षकांना माहिती द्या

# मलकुंड / खड्डे स्वच्छ करणारे



मलकुंड / खड्डा स्वच्छ करणारे कामगार



## १. मलकुंड / खड्डे स्वच्छ करणारे कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या





अवमल स्वच्छक वाहनाच्या सहाय्याने मलकुंड / खड्डा स्वच्छ करा व गाळ योग्य जागी संकलित करा




- सेप्टिक टँक / मलकुंड साफ करण्याआधी त्याचे झाकण तीन ते चार तास आधी उघडून ठेवा
- त्यामुळे त्यातील दूषित वायु बाहेर निघून जातील

**टीप:** काडी पेटविल्याने किंवा दुर्गंधीचा अभाव घातक पदार्थांचे अस्तित्व दाखवून देत नाही.



मलकुंड / खड्ड्यांची स्वच्छता फक्त दिवसा होण्याची खातरजमा करा.



निर्वात वाहन व अन्य उपकरणांची योग्य ती देखभाल करा



आपल्या महिनाभरात केलेल्या कामांच्या नोंदी ठेवा



अवमल स्वच्छ करताना त्या ठिकाणी धुम्रपान करू नये किंवा अग्नी प्रज्वलित करू नये



उचित लेखी परवानगी शिवाय मलकुंडात / खड्ड्यात उतरण्यास संमती देऊ नका



अवमलाची  निवासी भाग किंवा जलधीच्या जवळ विल्हेवाट लावू नये.



वाहन वेगाने चालवू नये किंवा वेगमर्यादेचे उल्लंघन करू नये

## २. आपली सुरक्षा यंत्रावली



सुरक्षा चष्मे, एन ९५ मुखपट्टी, १३ इंची नायट्राइल हातमोजे, गणवेष, परिधान करा



मलकुंड रिकामे केल्यावर साबण व पाण्याने हात धुवायला विसरू नका.



अवमल स्वच्छ करताना व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे परिधान करा.



प्रत्येक वापरानंतर आपली व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे पाणी व साबणाने स्वच्छ करून व प्रक्षालन करून सुरक्षित जागी ठेवा.

> "मलकुंड / खड्ड्यांची मानवी हातांनी स्वच्छता करणे भारतात पूर्णपणे प्रतिबंधित आहे."






आपली व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे फाटली किंवा खराब झालेली असल्यास किंवा किमान ६ महिन्यातून एकदा तरी बदला.

# वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा आणि काढण्याचा क्रम - शौचालय सफाई कर्मचारी




वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याआधी पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे



## वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा क्रम

१



फूल बॉडी सूट

२




एन ९५ मास्क

३



सुरक्षा चष्मे

४



शिरस्त्राण

५



नायट्राइल हातमोजे

६



स्टील टो गंबूट


## वयक्तिक सुरक्षा साधने काढण्याचा क्रम

१




स्टील टो गंबूट

२




नायट्राइल हातमोजे

३




शिरस्त्राण

४




सुरक्षा चष्मे

५



एन ९५ मास्क

६



फूल बॉडी सूट

वयक्तिक सुरक्षा साधने काढल्यानंतर पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे



## ३. आपली अवजारे व स्वच्छक माहित करून घ्या



सुसज्ज मलकुंडी वाहन हे आपले स्वच्छतेचे उपकरण आहे



सुरक्षा उपकरणे कार्यरत व काम करण्यास योग्य असल्याची खातरजमा करा



मलकुंड / खड्डे स्वच्छ करताना वापरली जाणारी उपकरणे स्फोट व अग्निरोधी असल्याची खातरजमा करा



काम पूर्ण झाल्यावर उपकरणे स्वच्छ करा व त्यांची नियमित देखभाल करा.

# नाले स्वच्छ करणारे



## नाले स्वच्छ करणारे कामगार





### १. नाले साफ करणारे कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या:



खुल्या, अंशतः खुल्या, व बंदिस्त नाल्यातील गाळ घनकचरा बाहेर काढा व तुंबारा दूर करा.



महिन्याभरात आपण केलेल्या कामाच्या नोंदी ठेवा.



अनावृत्त हातांनी कचरा हाताळू नका.



नेहमी पर्यवेक्षकाच्या देखरेखीखाली चमूमध्ये काम करण्याची खबरदारी घ्या




कोणत्याही प्रकारच कचरा कुठेही न फेकता निर्धारित ठिकाणीच त्याची विल्हेवाट लावा / त्यावर प्रक्रिया करा



कोणताही कचरा कामाच्या ठिकाणी तसाच ठेऊ नका



खोल आणि रुंद नाले साफ करण्यासाठी मशीनचा (ग्रॅबर्स आणि स्कूपर्स) वापर करावा.



काम झाल्यावर आपल्या शरीराचे दुषित झालेले अवयव पाणी व साबणाने परिपूर्णपणे स्वच्छ करावे

# २ आपली सुरक्षा यंत्रावली



सुरक्षा चष्मे , एन ९५ मुखपट्टी , १३ इंची नायट्राइल हातमोजे, गणवेष, परिधान करा



प्रत्येक वापरानंतर व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे साबण व पाण्याने स्वच्छ करून सुरक्षित जागी ठेवावेत.



स्वच्छता करताना विष्ठाजन्य मलाशी प्रत्यक्ष संपर्क टाळण्यासाठी व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे परिधान करा.




आपली व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे फाटली किंवा खराब झालेली असल्यास किंवा किमान ६ महिन्यातून एकदा तरी बदला



मलजल किंवा अवमलाशी थेट संपर्क टाळण्यासाठी रबर / नायट्राईल हातमोजे वापरा.

# वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा आणि काढण्याचा क्रम - ड्रेन क्लीनर





वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याआधी पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे




## वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा क्रम

१. 
एन ९५ मास्क


२. 
सुरक्षा चष्मे


३. 
शिरस्त्राण


४. 
नायट्राइल हातमोजे


५. 
जोड्यांसह मांड्या झाकणारे पोशाख

## वयक्तिक सुरक्षा साधने काढण्याचा क्रम

१. 
जोड्यांसह मांड्या झाकणारे पोशाख

२. 
नायट्राइल हातमोजे

३. 
शिरस्त्राण

४. 
सुरक्षा चष्मे

५. 
एन ९५ मास्क

वयक्तिक सुरक्षा साधने काढल्यानंतर पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे



## ३. कामाच्या ठिकाणी आपली अवजारे व उपकरणे माहित करून घ्या




नाले स्वच्छ करण्यासाठी उपस व उच्च दर्जाच्या चुषण यंत्राचा वापर करा. ही आपली स्वच्छता उपकरणे आहेत नाले स्वच्छ करण्यासाठी वापरलेल्या सर्व उपकरणांच्या कामांची सांगोपांग ओळख करून घ्या





खुल्या नाल्याची स्वच्छता करण्यासाठी उपसा व खड्डेपाडी यंत्रे वापरा.



कामगारांच्या प्रत्यक्ष संपर्कात आलेली / येणारी यंत्रे व उपकरणे

# रस्ते झाडणारे



रस्ते झाडणारे / स्वच्छ करणारे कामगार



## १. रस्ता झाडणारे कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या





बाजारपेठा, उद्याने इत्यादी सह रस्ते / गल्ल्या निर्धारित वेळापत्रकानुसार झाडा



अनावृत्त हातांनी कुठल्या तीक्ष्ण वस्तूला स्पर्श करायचे टाळा; त्यासाठी सुपली किंवा फावड्याचा उपयोग करा



नाले / जलधी किंवा कोणत्याही खुल्या क्षेत्रात कचरा फेकू नका.




रस्त्याच्या बाजूला व सार्वजनिक ठिकाणी ठेवलेल्या कचराकुंड्या स्वच्छ ठेवण्याची खातरजमा करा



फावडे आणि केरसूणीचा वापर करावा.



रस्ते झाडून संकलित झालेला कचऱ्याची वाहनातून वाहतुक होईल याची खातरजमा करा



रस्त्यावर कचरा फेकणाऱ्या रहिवाश्यांची नावे स्थानिक स्वराज्य संस्थांना कळवा

## २. आपली सुरक्षा यंत्रावाली



रस्ते झाडताना मुखपट्टी हातमोजे परावर्तक आवरण व जोडे परिधान करा.



धूळ व धुरापासून संरक्षण होण्यासाठी मुखपट्टी वापरणे आवश्यक आहे.



काम करताना दुखापती टाळण्यासाठी वेधन रोधी हातमोजे वापरावेत.



काम झाल्यावर हातमोजे, परावर्तक आवरण व पादत्राणे धुऊन व्यवस्थित ठेवावीत



सूर्योदय व सूर्यास्ताच्या वेळेस काम करताना परावर्तक आवरणे परिधान करणे आवश्यक आहे

# वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा आणि काढण्याचा क्रम - रस्ता सफाई कर्मचारी



वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याआधी पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे




## वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा क्रम

१




एन ९५ मास्क

३




नायट्राइल हातमोजे

२



परावर्तित जाकीट


४



शूज


## वयक्तिक सुरक्षा साधने काढण्याचा क्रम

१




शूज

३



नायट्राइल हातमोजे

२



परावर्तित जाकीट

४




एन ९५ मास्क


वयक्तिक सुरक्षा साधने काढल्यानंतर पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे




## ३. रस्ते झाडणारे म्हणून आपल्या जबाबदाऱ्या




कंटेनरयुक्त व्हील बॅरो




ट्रायसिकल




लांब झाडू



मेटल प्लेट





स्पेड



पॅन

जरूरी असणारी सर्व साधने उपलब्ध करून ठेवावी

झाडू, लांब झाडू यासारखी उपकरणे व औजारे आपल्याला मिळणे आवश्यक आहे



काम संपल्यावर सर्व उपकरणे त्यांच्या निर्धारित जागी ठेवा



दुखापती व थेट संपर्क टाळण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचा कचरा हाताळण्यासाठी उपकरणांचा उपयोग करा

# कुटुंब स्तरावरील कचरा संकलक



## कचरा हाताळणारे कामगार





### १. कुटुंब स्तरावरील कचरा संकलक कामगार म्हणून आपल्या जबाबदाऱ्या:



सर्व कुटुंबे व अन्य आस्थापनांकडून विलगीत केलेला कचरा संकलित करणे



कचरा संकलित करण्यासाठी ठरलेल्या मार्गाने पूर्वनिर्धारित वेळेचे पालन करा



रहिवासी / दुकानदारांना ओला व कोरडा कचरा विलगित करण्यास प्रोत्साहन द्यावे



सर्व घनकचरा कचरा संकलन वाहनाच्या द्वारे संकलित  करण्याची खबरदारी घ्या



कचरा संकलन करण्याच्या वाहनावर एक चालक व एक मदतनीस अशा दोन व्यक्ती असतील याची खातरजमा करा




संकलित सर्व कचरा ओला, कोरडा व विघटनयोग्य अशा पद्धतीने वर्गवारी करणे आवश्यक आहे



नाले / जलधी किंवा कोणत्याही खुल्या क्षेत्रात कचरा फेकू नका.



संसर्गजन्य कचरा अन्य कचऱ्या सोबत मिसळू नये, तसे झाल्यास संसर्ग फैलावण्याचा धोका उद्भवतो



## कचरा प्रक्रिया केंद्रात कचरा हाताळणारे कामगार म्हणून आपली जबाबदारी:








ओल्या व कोरड्या कचऱ्याचे विलगीकरण होत असल्याची खातरजमा करा.



कचऱ्याच्या डब्यात किंवा ढिगाऱ्यात अनावृत्त हात घालू नका



वर्गवारी नुसार कचऱ्याची प्रतवारी करून त्यामध्ये कचरा फेका.



कचरा साठवण्याची जागा
कोरडी व कीड / कीटक मुक्त
असणे आवश्यक आहे.



प्रथमोपचार संच पुरेश्या
प्रमाणात उपलब्ध असल्याची
खातरजमा करा.



ओल्या कचऱ्याचे खतात रुपांतर करणे
आवश्यक आहे



कचरा हाताळताना आपल्याला कापल्यास,
खरचटण्याची छिद्रण करणारी दुखापत
झाल्यास औषधोपचार करावा

# २. आपली सुरक्षा यंत्रावली



गणवेष व मुखपट्टी, परावर्तक आवरण / कवच, हातमोजे, अशी उचित व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे परिधान करा




आपली व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणे फाटली किंवा खराब झालेली असल्यास किंवा किमान ६ महिन्यातून एकदा तरी बदला



काम झाल्यावर आवरण / कवच, हातमोजे व पादत्राणे साबण व पाण्याने स्वच्छ धुऊन वाळवा.



आपली सुरक्षितता व आरोग्यासाठी, कचरा संकलन करताना व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे परिधान करावीत.


# वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा आणि काढण्याचा क्रम - कचरा हाताळणारे




वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याआधी पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे




## वयक्तिक सुरक्षा साधने घालण्याचा क्रम




एन ९५ मास्क




परावर्तित जाकीट





नायट्राइल हातमोजे





शूज


## वयक्तिक सुरक्षा साधने काढण्याचा क्रम





शूज




परावर्तित जाकीट




नायट्राइल हातमोजे





एन ९५ मास्क


वयक्तिक सुरक्षा साधने काढल्यानंतर पाणी आणि साबणाने हात स्वच्छ धुणे




## ३. कामाच्या ठिकाणी आवश्यक असणारी आपली अवजारे व उपकरणे जाणून घ्या




कंटेनरयुक्त व्हील बॅरो



कंटेनरयुक्त ट्रायसिकल



स्पेड



पुशकार्ट



मिनी ट्रिपर

फावडे, खण असलेली तिचाकी / हातगाडी / ढकलगाडी इत्यादी उपकरणे वापरा





कचरा टाकण्यासाठी विभाजक / खण असलेली तिचाकी / ढकलगाडी / हातगाडी असल्याची खातरजमा करा

संकलन करण्यासाठी आवश्यक ती अवजारे व उपकरणे तसेच योग्य ती वाहने असल्याची खातरजमा करा



काम झाल्यावर वाहन ठरलेल्या जागी ठेवावे.



आपल्या सुरक्षिततेसाठी वाहन स्वच्छ व तंदुरुस्त ठेवण्याची खबरदारी घ्या.



## ब.

# नियोक्त्यांशी सबंध

स्वच्छता कामगार म्हणून आपल्या कामाच्या बहुलते बाबत माहिती व जागरूक असणे आवश्यक आहे. आपल्यापैकी बहुतांश कामगार हे रोजंदारीवर किंवा आपसातील तोंडी बोलीनुसार अतिशय कमी वेतनावर काम करीत आहात. परंतु लेखी स्वरूपातील कायदेशीर रोजगार करार असणे आवश्यक आहे, त्यामुळे कामाच्या ठिकाणी सुरक्षितता निश्चित होते. सदर करार आपण व आपल्या नियोक्त्यामध्ये निष्पादित होणे आवश्यक आहे. यामुळे आपल्या जबाबदाऱ्या व कर्तव्ये निश्चित होऊन आपल्याला सुरक्षितता मिळेल व आपले अधिकार आपण अमलात आणू शकाल.

## आपल्या नियोक्त्यांशी संबंधांबाबत माहिती करून घ्या



आपल्या नियोक्त्याशी निष्पादित झालेल्या लेखी स्वरुपातील कराराची प्रत आपल्याकडे असणे अत्यावश्यक आहे



हाताने स्वच्छता टाळण्यासाठी आपल्या नियोक्त्याने आपणास यंत्रे व उपकरणे पुरविणे आवश्यक आहे.



आपल्या लेखी करारात खालील मुद्दे समाविष्ट असणे आवश्यक आहे :

- आठवडा / महिना / वर्षातील कामाचे तास
- आवश्यक व्यक्तिगत सुरक्षितता अवजारे, उपकरणे व अन्य अवजारे यांची तरतूद
- वेतन ( कुशल / अकुशल कामगारांसाठी असलेल्या राज्याने विहित केलेल्या किमान वेतनानुसार )
- पगारी सुट्ट्या
- कुटुंबीय व अन्य अवलंबून व्यक्तींचे तपशील
- आरोग्य तपासण्यांची वारंवारता



कामानुसार यथोचित व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे उपलब्ध करवून काम करताना ती परिधान करणे आवश्यक आहे



आपले काम सुविहित पद्धतीने होण्यासाठी आपणास स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वेळोवेळी सुरक्षिततेशी संबंधित प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे

क.

## हक्क व अधिकार

कमी उत्पन्न असलेल्या लोकांना पाठबळ देण्यासाठी शासनाने अनेक कल्याण व विमा योजना कार्यान्वित केल्या आहे. कर्ज व वित्तीय सहाय्याच्या अनेक योजना आहेत, परंतु दस्तऐवजांच्या व योग्य माहिती – ज्ञानाच्या अभावी अनेकांना तिथपर्यंत पोहोच मिळत नाही. आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला सुरक्षा पुरवणारे विविध कार्यक्रम व योजना यांच्याशी जोडलेल्या आपल्या अधिकार व हक्कांबाबत आपण जागरूक असणे आवश्यक आहे.

### आपले हक्क व अधिकार जाणून घ्या



हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे अधिनियम - २०१३ नुसार

कोणतीही स्थानिक स्वराज्य संस्था मलकुंड / खड्डे, नाले हाताने स्वच्छ करण्याचे कोणत्याही व्यक्तीकडून करून घेणार नाही.



व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे ठेवण्यासाठी ठराविक जागा असणे आवश्यक आहे.



नियोक्ता किंवा स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडून छायाचित्र असलेले ओळखपत्र.



स्वच्छ पाणी व शौचालय सुविधा, साबण, कागदी पंचे इत्यादींची सोय



## आपल्या व आपल्या कुटुंबाच्या लाभासाठी आपण खालील शासकीय योजनांशी जोडलेले असणे आवश्यक आहे:

Pradhan Mantri Jeevan Jyoti Bima Yojana

**पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY):**

दरवर्षी रु ४३६ अधिमुल्य घेऊन कोणत्याही कारणाने विमित व्यक्तीचा मृत्यू झाल्यास रु २.०० लाख रकमेच्या जीवन विमा कवचाची तरतूद करण्यात आली आहे. उपरोक्त अधिमुल्य भरून सदर विमा सुविधा दरवर्षी नवीनीकरण करता येते.




**पंतप्रधान सुरक्षा विमा योजना (PMSBY):**

दरवर्षी रु २० अधिमुल्य घेऊन अपघाती मृत्यू व अपंगत्वासाठी रु २.०० लाख रकमेच्या सर्वसाधारण विमा कवचाची तरतूद करण्यात आली आहे.

Atal Pension Yojana

**अटल निवृत्तीवेतन योजना :**

६० वर्षे वय पूर्ण झाल्यावर दरमहा रु १००० ते ५००० पर्यंत निवृत्ती वेतन.

**पंतप्रधान जनधन योजना (PMJDY):**

बँकिंग – बचत व मुदत ठेवी, प्रेषण, कर्ज, विमा व निवृत्तीवेतन इत्यादी वित्तीय सेवा व सुविधा परवडण्याजोग्या मुल्यास उपलब्ध होण्यासाठी बँकेत जनधन खाते उघडण्यात येईल. शून्य शिल्लक अनुज्ञेय असलेल्या या बँक खात्यात थेट लाभ रकमा अंतरित करण्यात येतील.

**पंतप्रधान प्रत्येक घरात सहज वीज योजना – सौभाग्य योजना :**

अद्याप वीज न पोहोचलेल्या सर्व उर्वरित घरांना विजेची जोडणी देऊन वीज पुरवीण्याची योजना .

**पंतप्रधान जन आरोग्य योजना (PM-JAY):**

दुय्यम व तिय्यम रुग्णालयात उपचार करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला रु ५.०० लाख रकमेचे आरोग्य विमा कवच.



ड.

# आरोग्य, स्वास्थ्य व आहार


स्वच्छता कामगार म्हणून काम करताना अनेक धोकादायक जैविक व रासायनिक स्वच्छकांच्या संपर्कात येता. त्याचप्रमाणे हातापायाला कापण्याच्या जखमा आणि अन्य शरीरीत दुखापतींचा धोका देखील तुम्ही पत्करता आणि विष्ठाजन्य कचऱ्याशी देखील आपला संबंध येतो. यामुळे आपल्याला विविध आजार व रोगांची लागण होण्याची शक्यता देखील वाढते. त्यामुळे आपणास आरोग्य, स्वास्थ्य व आहाराबाबत माहिती असणे महत्वाचे आहे. यामुळे आपण सुरक्षित राहाल व घरी जाताना कोणताही जंतू संसर्ग घेऊन जाणार नाही.




वर्षातून किमान दोन वेळा व वेळोवेळी आरोग्य तपासणी.



वैयक्तिक स्वच्छता ठेवा व रोज स्वच्छ धुतलेले कपडे परिधान करा.



डोळ्याला झालेली दुखापत कितीही किरकोळ असली तरीही त्याबाबत माहिती द्या.



रोजचे काम करून आल्यावर स्नान करा व संसर्गाची जोखीम टाळण्यासाठी स्वच्छ कपडे परिधान करा.



नखे नेहमी छोटी ठेवा व वेळोवेळी ती व्यवस्थित कापा.



काम झाल्यावर व भोजन घेण्यापूर्वी साबणाने हात स्वच्छ धुवा.



विविध रोगांचा संसर्ग न होण्यासाठी व त्यापासून संरक्षण मिळण्यासाठी लसीकरण वेळेवर करून घ्या



दररोज किमान २.५ लिटर पाणी प्या



नेहमी संतुलित आहार घ्या. दिवसातून तीन वेळा भोजन सेवन करा व शिळे पाके अन्न सेवन टाळा.



कापलेल्या व खरचटलेल्या जखमा नेहमी जलरोधक पट्ट्यांनी बंद कराव्यात.

## इ.
# काय करावे व करू नये

स्वच्छतेचे कुठलेही काम करताना काय करावे व करू नये याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे आपल्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी पालन करणे आवश्यक ठरते. ते सगळे आवश्यक मुद्दे लक्षात ठेवून काम केल्यास धोक्याची परिस्थिती उद्भवत नाही. काय करावे व करू नये यामध्ये आपल्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी विविध सूचना करण्यात आल्या आहेत.

### a. काय करावे



आपल्या कामाच्या स्वरूपानुसार स्वच्छतेचे काम करताना यथोचित व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे परिधान करा.



वापरलेले व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणांची जैववैद्यकीय डब्यात (पिवळ्या रंगाच्या) डब्यात विल्हेवाट लावा.



व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणांची विल्हेवाट लावल्यावर आपले हात स्वच्छ धुवा.




योग्य प्रशिक्षण मिळाल्याशिवाय कोणताही संभाव्य जोखिमी व धोकादायक काम करण्यास नकार द्या




सेवा करार, ओळखपत्र इत्यादी महत्वाचे दस्तऐवज काळजीपूर्वक जतन करा.



कामाच्या ठिकाणी स्वच्छता व सुरक्षितता ठेवा



कामाच्या वेळात योग्य गणवेष परिधान करा.



कामाशी संबंधित दुखापत किंवा आजार उद्भवल्यास आपल्या सहकारी किंवा पर्यवेक्षकांना कल्पना द्या



आपले सहकारी, नियोक्ते व नागरिकांशी नम्रतेने वागा.





आपल्या मुलांनी आयुष्य अधिक उत्तम पद्धतीने जगण्यासाठी त्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन द्या.



कामावर वेळेवर व नियमित राहा.

## b. काय करू नये



लेखी कराराशिवाय काम स्वीकारू नका.



यथोचित सुरक्षितता उपकरणे, अवजारे व साधने असल्याशिवाय आपले काम सुरु करू नका




वाचल्याशिवाय करारवर स्वाक्षरी करू नका.



शिरस्त्राण, चष्मे व मुखपट्टी यांना घाणेरड्या हाताने स्पर्श करू नका.



व्यक्तिगत सुरक्षात्मक उपकरणांशी मुलांना खेळू देऊ नका व त्यांच्या पासून ते लांब ठेवा.



कर्कश, आक्रमक किंवा शिवराळ भाषा वापरू नका.



आपल्या १६ वर्षे वयाखालील पाल्याला काम करू देऊ नका



कामाच्या ठिकाणी उपभोग्य बाबींचा अपव्यय करू नका किंवा अन्य ठिकाणी त्या वापरू नका



तातडी असल्याशिवाय, कर्तव्यावर असताना व वाहन चालविताना भ्रमणध्वनीचा वापर करू नका.



कोणत्याही ठिकाणी गोंधळास उत्तेजन देऊ नका



आजाराच्या कोणत्याही लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका व ताबडतोब वैद्यकीय उपचार करा



MAHA URBAN WASH-ES COALITION

महाराष्ट्र नागरी पाणी- स्वच्छता- आरोग्य आणि पर्यावरणीय स्वच्छता सहयोग
हा विभागीय नागरी आणि पर्यावरण अभ्यास केंद्र (RCUES),
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था (AIILSG), मुंबई
आणि युनिसेफ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेला उपक्रम आहे.

एम. एन. रॉय ह्युमन डेवलपमेंट कॅम्पस, प्लॉट नो. 6, 'एफ' ब्लॉक, नियर उत्तर भारतीय संघ, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१

www.mahawashcoalition.com